## अल्प मुदतीची जाहिरात

कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुटपक्षी पालन व्यवसाय सुरू करण्याबाबतचा दरकरार करण्या करीता नोंदणीकृत कुक्कुट व्यवसाय करणा-या कंत्राटदार कंपनी यांच्या कडून इच्छा पत्र मागविण्यात येत आहेत.

---

## जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांचे कार्यालय

---

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार हे विहित नमुण्यात कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पक्षी पालन व्यवसाय सुरू करण्या बाबतचा दरकरार करण्याकरीता नोंदणीकृत कुक्कुट व्यवसाय करणा-या कंत्राटदार कंपनी यांच्या कडून इच्छापत्र विहित नमुण्यात कंत्राअदार कंपन्यांकडून व्दि लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. जिल्यामध्ये सन 2011-12 मध्ये अंदाजे एकुण 15 ते 20 युनिट कंत्राट पध्दतीने मांसल कुक्कुट पक्षी पालन व्यवसाय सुरू करणे प्रस्तावीत आहे.

एकुण 4000 मांसल पक्षाचे एक युनिट राहील नोंदणीकृत कुक्कुट व्यवसाय करणा-या कंत्राटदार कंपनी यांच्या कडून इच्छा पत्र यांचे कडून कुक्कुट मांसल पक्षी वाढवणे बाबतचे दर प्रती किलो जिवंत पक्षाचे वजन या पध्दतीने मागविण्यात येत आहे.जी कंपनी जास्तीत जास्त दर देईल त्या कुपनीचे निवउ गुणवत्ते नुसार करण्यात येईल. कंत्राटदार कंपनिस 4000 मांसल पक्षांच्या प्रति युनिट करीता मुलभूत सुविधा उभारण्यासाठी /उपलब्ध सुवेधेत वाढ करण्यासाठी कंत्राटदार कंपनीस प्रति युनिट रू.100000/- मर्यादे पर्यंत अनुदान अनुज्ञेय राहिल.निवेदेचा नमुना त्याच्या अटी व शर्ती सोबत संबंधीत कार्यालया मध्ये दिनांक 17.9.2011 वेळ सकाळी 11 वाजे पासून दिनांक 26.9.2011 वेळ 16 वाजे पर्यात रू 2000/- (रू दोन हजार फक्त ) इच्छा पत्र नमुण्याची किंमत म्हणून भरून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मिळू शकेल. सदरच्या रक्कमेचा धनाकर्ष कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा असावा व तो जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांच्या नावे असावा.

निविदेचा वेळापत्रक (महत्वाच्या तारखा) या जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार जिल्हा नंदुरबार यांच्या कार्यालया मध्ये उपलब्ध आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | निविदेचा नमुना, त्याच्या अटी व शर्ती सोबत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार या कार्यालया मध्ये उपलबधता कालावधी | दिनांक-17.9.2011 वेळ 11.00 वाजे पासून ते दिनांक 26.9.2011 वेळ 16.00 वाजे पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत |
| 2 | निवेदेची इच्छा पत्र नमुण्यची किंमत | रू 2000/- (रू दोन हजार फक्त ) |
| 3 | निविदेची स्विकारण्याची अंतीम तारीख व वेळा | दिनांक 27.9.2011 वेळ 17.30 |
| 4 | निविदा उघडण्याची तारीख व वेळ व स्थळ | दिनांक 29.9.2011 वेळ 15.00 वा. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार कार्यालय |

अनामत रक्कमेचा रू 10,000/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त.) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांचे नावे काढावा.

जाहीर इच्छा पत्रच्या अनुशंगाने कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पक्षी पालन व्यवसाय सुरू करण्याचा दर करार करण्या करीता तांत्रिक माहिती, शंका / अडचणी या बाबत मार्गदर्शन / चर्चा करण्यासाठी दिनांक 22.9.2011 रोजी वेळ 16 वाजता जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार या कार्यालयात निविदा पुर्व सभा (प्रिबीड कॉन्फरन्स) आयोजीत केली आहे.

कोणतीही पुर्व सुचना वा काण नदेता इच्छा पत्र स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा, तसेच संपुर्ण इच्छापत्र प्रक्रिया रदद करण्याचा अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांनी राखून ठेवला आहे.

जावक क्रमांक जिपउ/तांत्रिक/ कुक्कुट/ 1451 /2011
नंदुरबार दिनांक :- 14.9.2011

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार
शासकीय मध्यवर्ती इमारत रूम नं-7
नंदुरबार

## जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जिल्हा नंदुरबार.

11 व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राष्ट्रिय कृषि विकास योजनेच्या माध्यमातून नंदुरबार जिल्हयामधील

1. नंदुरबार या तालुक्याच्या 1. भोणे 2. ढेकवद

2. तळोदा तालुक्याच्या 1. खर्डी

3.अक्कलकुवा तालुक्याच्या 1. ब्रिटीशअकुश विहीर 2. सांबर 3. वेहगी 4. गमण 5.जांगठी

4.अक्राणी या तालुक्याच्या 1. खडकी 2. उदडया 3.गोरंबा 4. चांदसैली 5.रोषमाळ.खुII 6. असली 7 मनवानी खुII 8. पाणबारी

या गावांच्या ठिकाणी पशुवैधक पदवी/ पदवीधारक सुशिक्षीत बेरोजगारामार्फत शेतक-यांच्या दारापर्यंत गाई / म्हशींना कृत्रिम रेतन सेवा सुविधा पुरविणे करीता सेवादात्यांची निवड करावयाची आहे. या मध्ये सन:- 2000-2001 या वर्षात रोजगार व स्वयंम रोजजगार या योजनेअंतर्गत काम केलेल्या पदवी/ पदवीधारक सुशिक्षीत बेरोजगांना तसेच ज्या ठिकाणी सदर सेवा दयावयाची आहे त्या ठिकाणच्या स्थानिक रहिवासी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. माहिती सादर करावयाचा नमुना आणि इतर अटीचा व शर्तीचा तपशिल प्रत्येक जिल्हयाच्या प्रतेक तालुकास्तरावरील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांचेकडे व पशुसंवर्धन खात्याच्या वेबसाईटवर ( http://ah.adfmaharashtra.in) उपलब्ध आहे विहीत नमुन्यातील माहिती पुर्णपणे भरूण, आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षाकित प्रतीसह आपल्या तालुक्याच्या पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांचेकडे अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करावयाचा अंतीम दिनांक:-23.9.2011 आहे. त्यानुसार सबंधितांनी याची नोंद घेवून विहीत नमुन्यातील माहिती मुदतीच्या आत समक्ष अथवा पोष्टाव्दारे पोहच होईल अशा रीतीने सादर करावे. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा नोंदणीसाठी विचार केला जाणार नाही.

दिनांक:- 14.9.2011

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
नंदुरबार